एम.जे.सी. क्र. ३३/२०२४
सुनिताबाई इंगळे –वि–
सुनिल तांदळे
निशाणी क्र. १५ खाली

<u>दिनांक – १९ एप्रिल, २०२५.</u>

(साक्षीदार मुंबई येथून दूरदृकश्राव्य प्रणालीद्वारे उपस्थित आहे.)

<u>सरतपासणी अर्जदारतर्फे विधीज्ञ श्री. एन.एस. तायडे यांच्यातर्फे, शपथेवर पुढे सुरु,</u>

५. पुराव्याचे शपथपत्र माझ्या सांगण्यानुसार लिहिण्यात आलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यामध्ये लिहिलेला मजकूर बरोबर आहे. मी माझ्या उपचारासंदर्भातील सर्व दस्तावेज या प्रकरणात निशाणी क्रमांक ११ वरील दस्त यादी सोबत दाखल केले आहेत.

<u>उलटतपासणी गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. आर.व्ही. पाटील यांच्यातर्फे</u>

६. हे खरे आहे की सुनील तांदळे यांनी जो दावा दाखल केला होता त्या दाव्यामध्ये मी माझ्या पतीसोबत हजर राहत होते. हे खरे आहे की एखाद्या तारखेला जर मी येऊ शकले नाही तर माझे पती येऊन वकिलांना भेटत असत. हे खरे आहे की त्या दाव्यामध्ये मी माझा पुरावा न घेता माझी बाजू बंद केली. प्रस्तुत अर्ज दाखल करतेवेळी ज्या तारखेला त्या प्रकरणाचा निकाल लागला त्या तारखेची माहिती मी वकीलांना दिली नव्हती. हे खरे नाही की निकाल लागल्यानंतर मी माझ्या वकिलांना सांगितले होते की त्या निकालाच्या प्रमाणित प्रती काढून घ्या. निकालाच्या प्रमाणित प्रती काढून घेण्यासाठी माझ्या मुलाला निकालानंतर पंधरा दिवसांनी सांगितले होते. माझे पती आणि मुलगा हे दोघे

निकाल लागल्यानंतर मलकापूर कोर्टात येऊन वकिलांना भेटले होते याची मला माहिती नाही.

(साक्षीदारास आवाज पोहोचत नाही असे सांगण्यात आले आणि त्यामुळे पुढील उलटतपास थांबविण्यात आला.)

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.04.19 18:05:48 +0530

**(सं.वि. जाधव)**
जिल्हा न्यायाधीश–१,
मलकापूर.

मलकापूर.
दिनांक – १९/०४/२०२५.

– – – – –